नि.दि.दा.क्र.२५/२०१७
नि.११९
सुर्यकांत वि. माधव व इतर

## वादीतर्फे साक्षीदार क्र. ४

नाव – अमीत मनोहर गायकवाड
वय – ३९ वर्ष, व्यवसाय – तलाठी, पारशिवनी
राहणार.– पारशिवनी जि. नागपूर

**नि. क्र. १०२ वरील आदेशान्वे. वादीतर्फे साक्षीदार क्र. ४ चा सरतपास श्री एम.डी. पालीवाल वकील साहेब यांच्यामार्फेत शपथेवर सुरुः**

**१.** मी आज रोजी पारशिवनी येथे तलाठी या पदावर कार्यरत आहे. मी ऑगस्ट २०२४ पासून तलाठी या पदावर पारशिवनी येथे कार्यरत आहे. साक्ष देण्याकामी मला नोटीस प्राप्त झाली होती. मला मौजा पारशिवनी सर्वे नं. ४३४ जमीन महसूलची वायदा पावतीची दुय्यम प्रत सादर करण्याबाबत व साक्ष कामी हजर राहण्याबाबत नोटीस प्राप्त झाली होती. मी वायदा पावतीची दुय्यम प्रतीची शोध घेतला असता कार्यालयात मिळून आली नाही. त्यासंबंधात मी अभिलेखावर पत्र दाखल केले आहे. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १२०** देण्यात येते. कार्यालयात मागील ३५ ते ४० वर्षांचा रेकॉर्ड उपलब्ध आहे. परंतु, त्यातील काही दस्त खराब झालेले आहे. मौजा पारशिवनी सर्वे नं. ४३४ जमीन महसूलची वायदा पावतीचा दस्त गहाळ झाल्याअसल्याकारणाने मी त्या दस्ताची दुय्यम प्रत न्यायालयासमक्ष सादर करु शकलो नाही. वायदा पावतीस विशेष अनुक्रमांक असतो. आता मला मौजा पारशिवनी सर्वे नं. ४३४ जमीन महसूलची वायदा पावतीचे दोन मूळ प्रत **आर्टिकल अ** दाखविण्यात आल्या. सदर पावत्या आमच्याच कार्यालयाने दिल्या आहे. परंतु त्यावर कार्यालयाचा शिक्का नाही. सदर पावत्या खऱ्या आहे. त्यास **नि. क्र. १२१ व १२२** देण्यात येते. आता मला **आर्टिकल एफ** मौजा पारशिवनी सर्वे नं. ४३४ जमीन महसूलची

वायदा पावतीचे चार मूळ प्रत दाखविण्यात आल्या. सदर पावत्या आमच्याच कार्यालयाने दिल्या आहे. परंतु त्यावर कार्यालयाचा शिक्का नाही. सदर पावत्या खऱ्या आहे. त्यास **नि. क्र. १२३ ते १२६** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ व ११ तर्फे श्री पियुष सायरे वकील साहेब यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१२१ व १२२ या वायद्याच्या पावत्या सन १९९३ सालच्या आहेत. त्या कालावधीत पारशिवनी येथील तलाठी कोण होते याची माहीती मला नाही. त्या कालावधीत कोण पटवारी होते याची मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कार्यालयामार्फेत देण्यात येणाऱ्या पावत्यांवर कार्यालयाचा शिक्का अनिवार्य आहे.

**प्रश्न** – सदर पावत्याबाबत रेकॉर्ड रुममध्ये शोध घेतला काय

**उत्तर** – होय.

वायद्याची पावती दिल्यानंतर त्यासंबंधी दस्त माझ्या कार्यालयात राहते. हे म्हणणे खरे आहे की, वायदा पावती वहीस अनुक्रमांक असते व त्याची नोंद कार्यालयात आवक रजिस्टरमध्ये घेतली जाते.

**प्रश्न** – नि.क्र. १२१ व १२२ या वायद्याच्या पावती पुस्तकाच्या अनुक्रमांकाची नोंदीची चौकशी आवक रजिस्टर मध्ये आहे किंवा काय याचा शोध घेतला काय.

**उत्तर** – त्या कालावधीतील रजिस्टर आमच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत.

हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. १२१ व १२२ या पावत्या तलाठी पारशिवनी यांनी दिल्या आहेत हे मी निश्चित सांगू शकत नाही कारण त्यावर कार्यालयाचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. ४३४ चे आज रोजी १० लोक मालक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६१ या ७/१२ वर प्रत्येक भोगवटधारकाचे क्षेत्र नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे

की, १० लोक मालक असल्यास त्यापैकी १ मालक वायद्याची पावती भरु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, वायद्याची पावती हा मालकी हक्काचे दस्त नाही.

**उलटतपास पुर्ण .**

**फेर–तपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.02.21 18:28:43 +0530

**(जी. ओ. वानखडे)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.02.21 18:28:48 +0530

**(जी.ओ.वानखडे)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
पारशिवनी

दिंनाकः२१/०२/२०२६